# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १८६-२३** **दिनांक १०/०६/२०२३**

**५०३ ग्रॅम वजनाचा ०१,००,६०,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ विक्री करीता बाळगणाऱ्या परकीय नायजेरीयन इसमावर अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत मिरारोड, काशिमिरा, भाईंदर परिसरात अंमली पदार्थाची खरेदी विक्री करणारे ईसमांचा शोध घेवुन त्यांचेकडे काही आक्षेपार्ह चिजवस्तु मिळुन आल्यास कायदेशीर कारवाई करणेबाबत वरिष्ठांनी सुचना व मार्गदर्शन केले होते.

वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रभारी पो.नि. श्री. अमर मराठे व पोलीस स्टाफ हे दिनांक ०७.०६.२०२३ रोजी जी.सी.सी.क्बल हाटकेश ते बाबा टायर बाजुकडे मिरारोड (पुर्व) येथे गस्त करीत असताना एक परकीय नायजेरीन इसम हा त्याचे खांदयावर ब्राउन रंगाची हॅन्डबॅग अडकवलेल्या स्थितीत संशयास्पद आढळुन आल्याने वर नमुद स्टाफ यांनी कायदेशीर बार्बीची पुर्तता करुन त्यास ताब्यात घेत असताना तो पळुन जाण्याचा प्रयत्न करीत होता. पोलीस स्टाफने सदर इसमास शिताफीने ताब्यात घेवुन त्याची झडती घेतली असता त्याचे कब्ज्यात ५०३ ग्रॅम वजनाचा ०१,००,६०,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्री करीता बाळगला असल्याचे निदर्शनास आले. सदर नयजेरीयन इसमाविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. ाा ४१३/२३ एन.डी.पी.एस कायदा १९८५ चे कलम ८ (क), २२ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास अंमली पदार्थ विरोधी पथक करीत आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. विजयकुमार मराठे, सहायक पोलीस आयुक्त (मुख्यालय) तथा अति. कार्यभार सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रभारी पो.नि. अमर मराठे, स.पो.नि.विलास कुटे, पो.हवा. इंगळे, टक्के, पाटील, आव्हाड, सपकाळ, म.पो.हवा. एक्कलदेवी, पो.अंम. यादव यांनी केली आहे.


अंमली पदार्थ विरोधी कक्ष
मिरा-भाईंदर वसई-विरार
DRUGS
DRAG YOU
DOWN